**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**
माझे नाव - साईनाथ रंगराव महेकर
वय - २२ वर्षे
व्यवसाय - नोकरी जवान
रा/ने - निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कुडाळ क्र. ३ जि. सिंधुदूर्ग.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. १९/०३/२०२५ रोजी माझी नेमणूक निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क कुडाळ क्र. ३ या कार्यालयात होती. सदर दिवशी दुपारी १०.१० वा. निरिक्षक साहेब यांना बातमी मिळाली की, मौजे कट्टा येथील ए वन चायनिज सेंटरच्या मागील बाजूस काशीनाथ विठोबा साळगावकर हा अवैधरित्या गोवा बनावटीच्या दारु विक्रीचा व्यवसाय सुरु आहे. म्हणून दुपारी १०.२० वा. मी, दुय्यम निरिक्षक वंजारी मॅडम, पंच व इतर स्टॉफ असे मौजे कट्टा येथे शासकीय वाहनाने गेलो. तेथे ए वन चायनिज सेंटरच्या मागे छापा टाकला असता त्या ठिकाणी एक इसम हातामध्ये कापडी पिशवी घेवून संशयास्पदरित्या दिसून आला. म्हणून मॅडमनी त्याला थांबवून त्या पिशवीमध्ये काय आहे याची विचारणा केली असता त्याने घाबरत बॉब्स लेमन व्होडकाच्या सिलबंद बाटल्या असल्याचे सांगितले. म्हणून मॅडमने त्या पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये गोवा बनावटीच्या बॉब्स लेमन व्होडकाच्या १८० मिली मापाच्या ४० सिलबंद बाटल्या मिळून आल्या. मॅडमनी त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव काशिनाथ विठोबा साळगावकर वय ३४ वर्षे रा. घर नं. २०७ गुरामवाडी ता. मालवण जि. सिंधुदूर्ग असे सांगितले. मिळालेल्या मुद्देमालातून नमूना प्रथकरणासाठी दोन सिलबंद बाटल्या कार्यालयीन पितळी मोहर उमठवून सिलबंद केल्या. उर्वरित मुद्देमाल सिलबंद करुन आपल्या ताब्यात घेतला. मी कार्यालयात येवून आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. साक्षीदारास दि. १९/०३/२०२५ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१** दिली आहे. मी आरोपीस दाखविल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.अमेय कुळकर्णी यांचेमार्फत**

२. बातमी मिळाल्यानंतर पंचाना कधी बोलविले याची वेळ मला सांगता येणार नाही. बातमी मिळाल्यानंतर किती वेळानी पंच आले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मौजे

कट्टा बाजारपेठ हा दाट लोकवस्तीचा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर आम्हाला सहज स्थानिक पंच मिळाले असते. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणात असलेले पंचानी आमच्या कार्यालयासाठी अनेक पंचनाम्यामध्ये पंच म्हणून काम केलेले आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयात स्वतंत्र मुद्देमाल कक्ष आहे. आमच्या कार्यालयात मुद्देमाल कक्षात स्वतंत्र कारकून व रजिष्टर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल ठेवताना व काढताना त्याची नोंद रजिष्टरमध्ये करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, तपासणीसाठी काढलेले सॅम्पल व उर्वरित मुद्देमाल याचे स्वतंत्र नोंद करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, आढळून आलेल्या इसमाची खात्री करण्यासाठी जागीच कागदपत्रांची पाहणी करुन ओळखीबाबत खात्री केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आढळून आलेल्या इसमास जागीच नोटीस देण्यात आलेली नव्हती. नोटीस देताना त्यामध्ये गुन्हा क्रमांक नमूद करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, छापा टाकल्यानंतर आम्ही कार्यालयात गेल्यानंतर आणि तक्रार दाखल केल्यानंतर गुन्हा रजिष्टर नंबर देण्यात येतो. हे म्हणणे खरे आहे की, म्हणून जागीच नोटीस दिली असेल तर त्या नोटीसमध्ये गुन्हा क्रमांक नमूद करणे अशक्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या चायनिज सेंटरच्या मागे छापा टाकला त्या जागेच्या मालकीबाबत कागदपत्रांची पाहणी करुन खात्री केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, द्रव पदार्थाच्या बाटल्यांवर उत्पादकाचे नाव, बॅच नंबर तारीख इत्यादी मजकूर नमूद असतो. हे म्हणणे खरे आहे की, फक्त नावावरुन वर नमूद माहिती शिवाय बाटल्यांची ओळख पटवता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वर नमूद माहिती मी माझ्या फिर्यादमध्ये नमूद केलेली नाही तसेच ती माहिती आजही सांगू शकत नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद किती वाजता दाखल केली हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत मुद्देमाल मी मुद्देमाल कक्षात जमा केलेला नव्हता.

५. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/०३/२०२५ रोजी माझी नेमणूक निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क कुडाळ क्र. ३ या कार्यालयात होती, सदर दिवशी दुपारी १०.१० वा. निरिक्षक साहेब यांना बातमी मिळाली की, मौजे कट्टा येथील ए वन चायनिज सेंटरच्या मागील बाजूस काशीनाथ विठोबा साळगावकर हा अवैधरित्या गोवा बनावटीच्या दारु विक्रीचा व्यवसाय सुरु आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, म्हणून दुपारी १०.२० वा. मी, दुय्यम निरिक्षक वंजारी मॅडम, पंच व इतर स्टॉफ असे मौजे कट्टा येथे शासकीय वाहनाने गेलो, तेथे ए वन चायनिज सेंटरच्या मागे छापा टाकला असता त्या ठिकाणी एक इसम हातामध्ये कापडी पिशवी घेवून संशयास्पदरित्या दिसून आला, म्हणून मॅडमनी

त्याला थांबवून त्या पिशवीमध्ये काय आहे याची विचारणा केली असता त्याने घाबरत बॉब्स लेमन व्होडकाच्या सिलबंद बाटल्या असल्याचे सांगितले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, म्हणून मॅडमने त्या पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये गोवा बनावटीच्या  बॉब्स लेमन व्होडकाच्या १८० मिली मापाच्या ४० सिलबंद बाटल्या मिळून आल्या, मॅडमनी त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव काशिनाथ विठोबा साळगावकर  वय ३४ वर्षे रा. घर नं. २०७ गुरामवाडी ता. मालवण जि. सिंधुदूर्ग असे सांगितले, मिळालेल्या मुद्देमालातून नमूना प्रथकरणासाठी दोन सिलबंद बाटल्या कार्यालयीन पितळी मोहर उमठवून सिलबंद केल्या, उर्वरित मुद्देमाल सिलबंद करुन आपल्या ताब्यात घेतला, मी कार्यालयात येवून आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गस्तीसाठी फिरत असताना बेवारस मुद्देमाल मिळून येत असतो. हे म्हणणे खरे नाही की, बेवारस मुद्देमाल आरोपीच्या माथी मारुन त्याच्याविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, कथीत गुन्हयाशी आरोपीचा काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कथीत मुद्देमालाशी व आरोपीच्या घराचा काही संबंध नाही.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. ०३-१२-२०२५

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.